International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.328
Vol.9 No.1 Sept – Oct 2021

# सहकारी चळवळ : काल आणि आज

**श्री. शिंदे शेखर सावता**
**सहा. प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,**
**मुधोजी महाविद्यालय, फलटण.**

**गोषवारा :-**

महाराष्ट्र सहकारात कायमच आघाडीवर राहिला आहे. आजही महाराष्ट्रातच सर्वाधिक सहकारी बँका आहेत. सहकारी बँकांमुळे बँकिंग क्षेत्र खऱ्या अर्थाने तळागाळापर्यंत पोहोचले. जिल्हा, तालुका, गावस्तरावर सहकारी बँका उभ्या राहिल्या. सहकारी साखर कारखाने उभे राहिले. अनेक राजकीय नेते सहकाराच्या आधारानेच मोठे झाले. अगदी मुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचले. सहकार क्षेत्र टिकून राहिले पाहिजे, यासाठी राजकारणातील भांडणे सहकारात येऊ नयेत, अशीच भूमिका आजवर घेतली गेली आहे. महाराष्ट्राच्या स्थापनेची साठ वर्षे पूर्ण होत असताना, म्हणूनच सहकारी बँकाच्या वाटचालीचा, सद्यस्थितीचा आढावा घेणे आवश्यक आहे.

**<u>कळीचे शब्द</u>** :- 'को-ऑपरेटिव्ह, अर्थसंकल्प, रिझर्व्ह बँक, 'बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट, सहकारी बँक.

**<u>परिचय</u> :-**

सहकारी बँकिंगची भारतातील सुरुवात १९व्या शतकाच्या अखेरच्या टप्प्यात सुरू झाली. ब्रिटन, जर्मनी व अल्प प्रमाणात इटलीमधील सहकारी चळवळींची कामगिरी पाहून, भारतातील मध्यम व कनिष्ठ वर्गातही ही चळवळ योग्य दिसेल, या विचाराने चळवळीची सुरुवात झाली, असे म्हटल्यास हरकत नाही. भारतातील तत्कालीन व्यापारी बँका (जॉइंट स्टॉक बँक्स) मध्यम आणि समाजाच्या कनिष्ठ स्तरावर कर्जे देण्यास फारशा उत्सुक नव्हत्या. शिवाय वैयक्तिक जामीनकीवर कर्जवाटप करण्यास या बँका अजिबात तयार नव्हत्या; त्यामुळे गरजू वर्गासमोर सावकाराकडे जाऊन भरमसाठ व्याजाने कर्जे घेण्याव्यतिरिक्त अन्य कोणताही पर्याय उपलब्ध नव्हता. याउलट वर उल्लेख केलेल्या परदेशातील सहकारी बँकांची तीन-चार तत्त्वे, प्रिन्सिपल ऑफ को-ऑपरेशन, प्रिन्सिपल ऑफ म्युच्युअल हेल्प, डेमोक्रॅटिक डिसिजन मेकिंग आणि ओपन मेंबरशीप पाहून तत्कालीन बडोदा संस्थानामध्ये 'म्युच्युअल एड फर्स्ट सोसायटी' म्हणून, १८८९ मध्ये विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'अन्योन्य सहकारी मंडळी' या नावाने संस्था सुरू झाली. मध्यम व कनिष्ठ स्तरावर ठेवी गोळा करून, याच स्तरावरील गरजूंना कर्जवाटप करण्याचे काम मोठ्या उत्साहात सुरू झाले (ही संस्था अनेक वर्षे कार्यरत होती; पण गुजरात सरकारने अडचणीच्या वेळी जाहीर करूनही आर्थिक आधार न दिल्याने ती बंद करावी लागली.). पुढची अत्यंत महत्त्वाची घटना म्हणजे, १९०४ मध्ये भारत सरकारने पहिल्यांदा 'को-ऑपरेटिव्ह सोसायटी कायदा' मंजूर केला; त्यामुळे भारतामध्ये अशा सहकारी तत्त्वावरील संस्था सुरू करण्यास उत्तेजन मिळाले.

**<u>सहकार चळवळीचा इतिहास</u> :-**

कायद्यान्वये भारतामधील पहिली सोसायटी तत्कालीन मद्रास प्रांतातील कांजीवरममध्ये ऑक्टोबर १९०४ मध्ये स्थापन झाली. पाठोपाठ मुंबई, पुणे, कर्नाटकात काही ठिकाणी अशा संस्था स्थापन झाल्या. त्यात 'पायोनिअर अर्बन' (मुंबई, ११ नोव्हेंबर १९०५), 'नं.१ मिलिटरी अकाऊंट्स म्युच्युअल हेल्प क्रेडिट सोसायटी' (पुणे, ९ जानेवारी १९०६), 'कॉसमॉस को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी' (पुणे, १८ जानेवारी १९०६), 'जिल्हा दक्षिण रत्नागिरी' (आताचा सिंधुदुर्ग, नानकावी मठ व वरवडे विव्हर्स सोसायटी, १३ मार्च १९०६) यांचा समावेश होता. कर्नाटकातील बेळगाव येथे 'बेळगाव पायोनिअर' (२३ फेब्रुवारी १९०६) सुरू झाली. सर्वांत प्रसिद्ध अशी 'बॉम्बे अर्बन को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी' ही संस्था मुंबई शहरात विठ्ठलदास ठाकरसी आणि लल्लूभाई श्यामलदास यांच्या पुढाकाराने २३ जानेवारी १९०६ रोजी स्थापन झाली.

१९०४ मध्ये मंजूर झालेल्या को-ऑपरेटिव्ह सोसायटी कायद्यात, पुढे १९१२ मध्ये काही सुधारणा करण्यात आल्या. १९१५ मध्ये 'मॅक्लेगन समिती' स्थापन करून, संस्थांची पाहणी करून, त्या मजबूत कशा करता येतील, याची शिफारस करण्यात आली. या निमित्ताने एक महत्त्वाची ऐतिहासिक घटना लक्षात घेतली पाहिजे. १९१३-१४ च्या काळात किमान ५७ जॉइंट स्टॉक बँका कोसळल्या होत्या. त्या वेळेस ठेवीदारांनी या ५७ बँकांमधील ठेवी काढून, या ठेवी सहकारी सोसायट्यांमध्ये ठेवल्या. पुढे १९१९ मध्ये गव्हर्नमेंट ऑफ इंडिया कायद्यानुसार, सहकारी संस्था ही बाब तत्कालीन प्रांतांना देण्यात आली. तेव्हा मुंबई राज्य सरकारने १९२५ मध्ये भारतातील पहिला 'स्टेट को ऑपरेटिव्ह ॲक्ट' मंजूर करून, बचत स्व-मदत व परस्पर साहाय्य, याला प्राधान्य दिले. इतर राज्यांनीही पाठोपाठ आपले सहकारी कायदे मान्य करवून घेतले. त्यानंतर अनेक महत्त्वाच्या समित्यांनी सहकारी बँकिंगबाबत महत्त्वाच्या सूचना व कायदे केले.

'इंडियन सेंट्रल बँकिंग एन्क्वायरी समिती' (१९३१), 'मेहता भन्साळी समिती' (१९३९) व 'सहकारी प्लॅनिंग समिती' (१९४६), 'रूरल बँकिंग एन्क्वायरी कमिटी' (१९५०) यानंतर रिझर्व्ह बँकेने, १९५८-५९मध्ये सहकारी बँकांचा सखोल अभ्यास करून, १९६१मध्ये अहवाल प्रसिद्ध केला. याचा परिपाक म्हणून रिझर्व्ह बँकेने एक मार्च १९६६ पासून एक लाखापेक्षा अधिक भागभांडवल असलेल्या सहकारी बँकांना 'बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९' खाली आणून, खऱ्या अर्थाने दुहेरी नियंत्रण सुरू केले. यानुसार बँकिंगमधील विषय, लायसनिंग, एरिया ऑफ ऑपरेशन, इंटरेस्ट रेट्स... आदी रिझर्व्ह बँकेच्या, तर रजिस्ट्रेशन, मॅनेजमेंट, ऑडिट, लिक्विडेशनसारखे नियम संबंधित राज्याकडे दिले गेले. पुढे १९६८ मध्ये ठेव विमा योजनेखाली या सहकारी बँकाही सामील करून घेण्यात आल्या. परिणामी, १९४८-४९ मध्ये ८१५ इतकी असलेली सहकारी बँकांची संख्या, १९७८-८९ मध्ये १४०८ इतकी झाली. या सर्वाचा परिणाम म्हणून, ३१ मार्च २००३ अखेरीस भारतातील नागरी सहकारी बँकांची संख्या २१०४ झाली. त्यामधील ५६ शेड्यूल बँका होत्या. यातील ७९ टक्के बँका महाराष्ट्र, गुजरात, आंध्र, कर्नाटक व तमिळनाडूमध्ये होत्या. १९८८-८९ मध्ये ज्या बँकांची डिमांड अँड टाइम लायबिलिटीज ५० कोटी रुपयांपेक्षा अधिक आहेत, अशा ११ बँकांना रिझर्व्ह बँकेच्या सेकंड शेड्यूलमध्ये घेऊन, त्यांना शेड्यूल बँकांचा दर्जा देण्यात आला. विविध राज्यांमध्ये अर्बन बँकांची फेडरेशन स्थापन केली गेली आणि फेब्रुवारी १९७७पासून, संपूर्ण भारतातील अर्बन बँकांचे नॅशनल फेडरेशन, दिल्ली येथे मुख्यालय ठेवून स्थापण्यात आले. यापैकी महाराष्ट्रात ३४८, गुजरातमध्ये २६५, कर्नाटकात २२५, आंध्र प्रदेशात १३२, तमिळनाडूमध्ये १३१, पश्चिम बंगालमध्ये १११ व केरळमध्ये ६७ बँका होत्या.

आजघडीला, २४ जून रोजी जेव्हा बँकिंग रेग्युलेशन ॲक्टचा वटहुकूम मंजूर झाला, तेव्हा संपूर्ण देशात १४८२ नागरी सहकारी बँका आहेत. त्यापैकी ५८ मल्टिस्टेट आहेत. मध्यंतरी गुजरात राज्यातील 'माधवपुरा मर्कंटाइल सहकारी बँके'तील गैरव्यवहारामुळे या नागरी सहकारी बँकेला २००१ मध्येच मोठा हादरा बसला होता. १२०० कोटी रुपयांच्या ठेवी १७ वर्षांनी परत मिळू लागल्या आहेत. या बँकेचा परवाना रद्द करण्यात आला आहे. अगदी अलीकडे, सप्टेंबर २०१९ मध्ये 'पंजाब अँड महाराष्ट्र सहकारी बँके'मुळे तर संपूर्ण देशाला भयानक हादरा बसला. रिझर्व्ह बँकेने २३ सप्टेंबर २०१९ रोजी या बँकेवर निर्बंध लादून प्रशासक मंडळ नेमले. इतर अनेक नागरी सहकारी बँका, को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायट्या व हजारो ठेवीदारांचे हजारो कोटी रुपये या बँकेत अजूनही अडकून पडल्याने, त्या त्या ठेवीदारांचीही मोठी अडचण होत आहे. शिवाय यातून बाहेर कसे पडायचे हेदेखील अजून दृष्टीपथात येत नाहीय. अर्थात, अमित शहा यांनी जाहीर आश्वासन दिले आहे, की 'पंजाब अँड महाराष्ट्र सहकारी बँके'च्या, ८० टक्के ठेवीदारांच्या पूर्ण रकमा कायदेशीर कारवाईचा निर्णय झाल्यावर परत केल्या जातील. सध्या तरी वाट पाहण्याव्यतिरिक्त ठेवीदारांच्या हातात दुसरे काही नाही.

**<u>सद्यस्थिती</u> :-**

रिझर्व्ह बँकेच्या ताज्या आकडेवारीनुसार आज देशभरात एकूण ५३ शेड्युल्ड नागरी सहकारी बँका, तर ३१ राज्य सहकारी बँका आहेत. सहकारी पतपेढ्या सुमारे ५० हजारांहून अधिक आहेत. रिझर्व्ह बँकेने सध्या देशातील ४४ नागरी सहकारी बँकांवर निर्बंध घातलेले असून, नऊ बँकांवर एप्रिल महिन्यात कारवाईही केलेली आहे. पणजी (गोवा) येथे मुख्यालय असणाऱ्या 'म्हापसा सहकारी बँके'वर १७ एप्रिल रोजी, तर ठाणे येथील 'सीकेपी सहकारी बँके'वर दोन मे रोजी रिझर्व्ह बँकेने परवाना रद्द करून, बरखास्तीची कारवाई केली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील इतर तीन सहकारी बँकांवरची बंधने कालपरवाच आणखी पुढे वाढविण्यात आली आहे. मुंबईतील 'मराठा सहकारी बँके'वर ३१ ऑगस्ट २०१६ पासून रिझर्व्ह बँकेने खूप निर्बंध घातले आहेत. त्यांची मुदत आता एक ऑगस्टपासून पाच महिने, म्हणजे ३१ डिसेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. मुंबईतील 'कपोल सहकारी बँक' ही मल्टिस्टेट आहे. या बँकेवर ३० मार्च २०१७ पासून निर्बंध घालून, रिझर्व्ह बँकेचा एक वरिष्ठ अधिकारी प्रशासक म्हणून नेमला होता, तरीही बँक सावरली नाही; म्हणून बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक घ्यावी लागली. या निवडून आलेल्या संचालक मंडळालाही बँक सावरता न आल्याने, हे निर्बंध सहा महिन्यांनी, म्हणजे ३१ जानेवारी २०२१ पर्यंत वाढविण्यात आले आहेत. उस्मानाबाद येथील 'वसंतदादा नागरी सहकारी बँके'वर १३ नोव्हेंबर २०१७ पासून असलेले निर्बंध कालच, दोन महिन्यांसाठी, म्हणजे ३० सप्टेंबरपर्यंत वाढविले गेले आहेत. 'पेण अर्बन', 'कर्नाळा अर्बन बँके'चे भवितव्य सध्या न्यायालयीन प्रक्रियेत आहे.

रिझर्व्ह बँक कर्मचारी संघटनेने शक्तिकांत दास यांच्या कृतीचे कौतुक केले असून, ऑफ साइट सर्व्हेलन्सऐवजी ऑन साइट इन्स्पेक्शनवर भर द्यावा, असेही सुचविले आहे. अजून एक महत्त्वाची बाब म्हणजे, भारतातल्या विविध राज्यांमध्ये असणाऱ्या नागरी सहकारी बँकांच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीच्या बाबीदेखील एकजिनसी नाहीत. काही राज्यांमध्ये निवडणूक दर वर्षी, तर काही राज्यांमध्ये तीन किंवा पाच वर्षांनी घेण्यात येते. काही राज्यातील बँका दर वर्षी एक तृतीयांश संचालकांना पाळीपाळीने निवृत्त करून, त्यांच्या जागांसाठी निवडणुका घेत; तर काही बँकांमध्ये तेच तेच संचालक वर्षानुवर्षे निवडून येत असत. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी एक फेब्रुवारी रोजी लोकसभेपुढे अर्थसंकल्प ठेवताना हे सूचित केले होतेच, की सहकारी बँकांना रिझर्व्ह बँकेच्या पूर्ण नियंत्रणाखाली

आणले जाणार आहे. पाच फेब्रुवारी रोजी मंत्रिमंडळाने 'बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट अमेंडमेंट' मान्य केल्यानंतर, ते लोकसभेपुढे मांडले गेले, ३ मार्च २०२० या दिवशी. मात्र 'कोव्हिड-१९' मुळे अर्थसंकल्प मंजूर होऊ शकला नाही; कारण लोकसभा स्थगित करावी लागली नाही. म्हणून पुन्हा मंत्रिमंडळाच्या २४ जून रोजीच्या बैठकीत या निर्णयास मान्यता मिळून तो राष्ट्रपतींकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला. राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर त्वरित, म्हणजे २६ जून रोजी वटहुकूम काढण्यात येऊन, नागरी सहकारी बँकेचे बहुतांश नियंत्रण रिझर्व्ह बँकेकडे देण्यात आले आहे. रिझर्व्ह बँकेला बरेचसे अधिकार या वटहुकुमामुळे मिळाले असले, तरी रिझर्व्ह बँक वेळोवेळी आणि गरज लागेल, तेव्हा परिपत्रके काढून हे अधिकार वापरेल, हेदेखील स्पष्ट झाले आहे. रिझर्व्ह बँकेच्या आर. गांधी समितीने २०१५ मध्ये केलेल्या तीन शिफारसीदेखील फार महत्त्वाच्या आहेत. १०० कोटीच्या लहान लहान सहकारी बँकांना त्यांची इच्छा असेल, तर स्मॉल फायनान्स बँकेत बदलता येईल व परवाना मिळेल. त्या दिवशी अशा स्मॉल फायनान्स बँकाना व्यापारी बँक व शेड्युल्ड दर्जा मिळेल. ही शिफारस अमलात आली असून, बऱ्याच सहकारी बँका या पद्धतीने बदलत आहेत.

## आव्हाने व भविष्य :-

१५४४ नागरी सहकारी बँकांपाशी ठेव म्हणून ठेवले गेलेले एकूण ४ लाख ८४ हजार ३१६ कोटी रुपयांची जबाबदारी आता रिझर्व्ह बँककडे गेलेली आहे. त्याचप्रमाणे १०० कोटी रुपयांपेक्षा अधिक ठेवी असणाऱ्या लहान नागरी सहकारी बँकांना आणि सर्व ५३ मल्टिस्टेट सहकारी बँकांना ३१ डिसेंबरपूर्वी आपापल्या पोटनियमांमध्ये बदल करून बोर्ड ऑफ मॅनेजमेंट निर्माण करून, त्यावर तज्ज्ञ संचालक घेण्याची सक्ती करण्यात आली आहे. अद्याप अमलात न आलेली तिसरी महत्त्वाची शिफारस म्हणजे २० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक व्यवहार (ठेवी अधिक कर्जे) असणाऱ्या नागरी सहकारी बँकांची, त्यांची इच्छा असल्यास व्यापारी (कमर्शिअल) बँकेत परिवर्तन करता येईल. येणाऱ्या काळात रिझर्व्ह बँक, वरील सर्व बाबींकडे कसे पाहते आणि वटहुकुमाने मिळालेले अधिकार कसकसे वापरते, हे पाहावे लागेल. छोट्या छोट्या नागरी सहकारी बँकांना आपल्या कारभारात अधिक व्यावसायिकता आणणे आवश्यक ठरणार आहे; कारण असे न झाल्यास तशा बँकांचे सक्तीने विलीनीकरण अन्य मोठ्या सहकारी बँकेत करण्याचे अधिकार रिझर्व्ह बँकेला या वटहुकुमामुळे मिळाले आहेत. ठेवीदारांच्या ठेवी या सर्वातून अधिक सुरक्षित होतील, हे जरी वास्तव असले, तरीही नागरी बँकांची देशातील संख्या तीन आकडी होण्याची शक्यता माझ्यासारख्या अभ्यासकाला जाणवत आहे. राज्यांच्या अगर भारत सरकारच्या सहकार विभागातील अज्ञानी अधिकाऱ्यांचे अधिकार रिझर्व्ह बँकेसारख्या तज्ज्ञ व मध्यवर्ती नियंत्रकाकडे आले, ही आशादायक घटना आहे, असे मला वाटते; मात्र सहकारी अस्तित्व कायम राहिले पाहिजे, तरच मध्यम व तळागाळाच्या गरजूंना आपापल्या गरजा सुलभ रीतीने भागविता येतील. अमेरिकेत जर क्रेडिट युनियन्स उत्तम चालतात, युरोपातील 'राबो बँक' जर उत्तम चालते; तर भारतात रिझर्व्ह बँकेलाही ही काळजी घेणे गरजेचे ठरेल, असे भविष्यात दिसत आहे.

## संदर्भ :-

1. सहकार: तत्त्व, व्यवहार आणि व्यवस्थापन - डॉ. गो. स. कामत
2. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टिक्षेपात २००२ (भाग-२) आणि २००३
3. दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह हाउसिंग फायनान्स कार्पोरेशन लि. ४३ वा वार्षिक अहवाल २००३-०४
4. सहकारी संस्थांसाठी अर्थसाहाय्याच्या विविध योजना: प्रा. कृ. ला. फाले, वाय. एम. पणप
5. सहकाराची मूलतत्त्वे - प्रा. प्र. रा. कुलकर्णी

6. सहकारी विकास: प्रा. एल. पी. वाकळे, प्रा. डॉ. जी. एच. बारहाते
7. सहकारी संस्था रचना व कार्यपद्धती - टी. एस. जाधव
8. सहकार: डॉ. शहा / डॉ. दामजी
9. सहकार पाठ्यपुस्तक: इयत्ता – अकरावी (महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे)
10. सहकार पाठ्यपुस्तक: इयत्ता – बारावी (महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे)